RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १२८] गुरुवार, सप्टेंबर १२, २०२४/भाद्रपद २१, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४४**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ सप्टेंबर, २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक १०२४/प्र.क्र.२९/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही;

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकासह पोट-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेचः-

१. या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) नियम, २०२४ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५, च्या नियम ३४ नंतर खालील नियम दाखल करण्यात येत आहे. म्हणजेचः-

**"३४अ. प्रलंबित अपील प्रकरणांचे प्रकाशन**

न्यायाधिकरणासह अपील प्राधिकरण प्रलंबित अपीलांची यादी सामायिक पोर्टलवर नमुना ३२० मध्ये प्रकाशित करतील".

# नमुना ३२०

**(नियम ३४ अ पहा )**

प्रलंबित अपील प्रकरणांची यादी प्रकाशनासाठीचा नमुना

दिनांक ---------------- या तारखेपासून सुरू होणाऱ्या आणि -------------- संपणाऱ्या कालावधीची यादी

प्राधिकरणाचे नाव :- प्रथम अपील प्राधिकरण / न्यायाधिकरण

रक्कम रुपयात

| अ.क्र. | अपील क्र. | ज्या कायद्यांतर्गत अपील दाखल केले आहे. | टिन क्र./ नोंदणी क्र. | अर्जदाराचे नाव | अपील दाखल केल्याचा दिनांक | जर स्थगिती दिली असेल, तो दिनांक | स्थगीती वैध असल्यापर्यंतचा दिनांक | स्थगीती ज्या रकमेसाठी मान्य झाली ती रक्कम | स्थगीती अंतर्गत नसलेली रक्कम | किती सुनावणी तहकुबी मान्य केल्या आहेत | तिसरी सुनावणी तहकुब मान्य केल्याचा दिनांक | स्थगीती उठविण्यात आली आहे कि नाही किंवा कलम २६ च्या उप- कलम ६ च्या दुसऱ्या तरतुदीनुसार अतिरीक्त अंशतः रकमेचा भरणा केला आहे कि नाही. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मंदार केळकर,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 12th September, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT-1024/CR-29/Taxation-1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section (*4*) of section 83 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*4*) of section 83 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, namely:—

1. These rules may be called the Maharashtra Value Added Tax (Amendment) Rules, 2024.

2. After rule 34 of the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, the following rule shall be inserted, namely.—

**"34A Publication of list of pending appeal cases.**

The Appellate authority including the Tribunal shall publish, on the common portal, the list of pending appeals in Form 320."

**FORM 320**

(*See* rule 34A)

Form for publication of the list of pending appeals

List of the period beginning with -----------------date and ending on---------------

Name of the Authority : First Appellate Authority / Tribunal

Amount in Rs.

| Sr. No. | Appeal No. | Act under which the appeal is filed | TIN No. / Registration No. | Name of the Appellant | Date of filing appeal | Date of grant of stay, if any | Date upto which stay is valid | Amount for which stay is granted | Amount not under stay | Number of adjournment granted | Date on which 3rd adjournment granted | Whether stay is vacated or additional part payment made in terms of 2nd proviso to sub-section (*6*) of section 26 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANDAR KELKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.